<u>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरणांर्तगत बांधकाम, विस्तारीकरण, दर्जावाढ यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. एसटीसी-०२१७ /प्र.क्र.८६ /परि-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१८

<u>संदर्भ-</u> १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र: बीयुडी-२०१७/प्र.क्र.२६-अ (परिवहन)/ कार्या.०६, दि.०८.०२.२०१८
२) म.रा.मा.प.महामंडळाचे पत्र क्र.राप/ स्थाअ/ कामे/२८५, दि.२५.०१.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण या योजनेतंर्गत मागणी क्र.टी-५, ३०५५, मार्ग परिवहन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ००-मार्ग परिवहन, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०१) आदिवासी क्षेत्रात एस.टी.डेपोचा विकास, बांधकाम, दुरुस्ती (३०५५ ००४३), ३१-सहायक अनुदाने या बाबीखाली रु.१००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे.

सदर तरतूद वितरीत करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असता, आदिवासी विकास विभागाने संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये अर्थसंकल्पित निधीच्या ८०% मर्यादेत अमरावती विभागातील चिखलदरा बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे, धुळे विभागातील नवापूर बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे, नांदेड विभागातील माहूर बसस्थानकाच्या वाहनतळाचे डांबरीकरण करणे यासाठी एकूण रु.८०.०० लाख (अक्षरी रुपये ऐंशी लाख फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग/ नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

त्यानुसार सदर रु.८०.०० लाख एवढा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण या योजनेतंर्गत मागणी क्र.टी-५, ३०५५, मार्ग परिवहन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०० मार्ग परिवहन, ७९६-जनजाती क्षेत्र

उपयोजना, (०१) (०१) आदिवासी क्षेत्रात एस.टी.डेपोचा विकास, बांधकाम, दुरुस्ती (३०५५ ००४३) ३१- सहायक अनुदाने अंतर्गत अमरावती विभागातील चिखलदरा बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे, धुळे विभागातील नवापूर बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे, नांदेड विभागातील माहूर बसस्थानकाच्या वाहनतळाचे डांबरीकरण करणे याकामासाठी एकुण रु.८० लक्ष तरतूद वितरीत करण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे निधी वितरीत करण्यासाठी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण आधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास अदा करण्याची कार्यवाही करावी.

३. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांच्या दि.०८.०२.२०१८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२६११४५०१७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madhukar Sarjerao Ghogare

Digitally signed by Madhukar Sarjerao Ghogare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=539635e59a0a994a979279d79261fa9f3f9070d1a37dfe29dbc4be5d1c827801, serialNumber=344b951816c517fcea0454e21d7fde25cc87830c180514dafd445ec2bc6b50bf, cn=Madhukar Sarjerao Ghogare
Date: 2018.02.26 17:27:59 +05'30'

(म.स.घोगरे)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), मुंबई
३. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
५. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, पालघर
९. वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
१०. वित्त विभाग (व्यय -८/साऊ/अर्थसंकल्प-१०/अर्थोपाय) विनियम, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११. गृह विभाग (बीयुडी-१/बीयुडी-२/ परिवहन-४), मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती/परिवहन-१.